# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०९/१७
## दि.१२/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४४४/१७,भादविक ३०७,३४१,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | श्रीनिवास चव्हाण,वय-२२ वर्षे,रा.मांगडेवाडी,कात्रज,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | दत्ता विठ्ठल भंगे,वय-२४ वर्षे,रा.खोपडेनगर,गुजरवाडी,कात्रज,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१७ रोजी २१/०० वा.गुजर निंबाळकरवाडी रोडवरील बियर शॉपी पासुन थोड्या अंतरावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा जखमी भाऊ आगिराम रामदास चव्हाण,वय-२८ वर्षे,रा. गुलाबनगर,सिद्धीविनायक हाईटस,धनकवडी,पुणे हा त्याचे दुचाकी गाडीवरुन गुजर निंबाळकरवाडी रोडने गुलाबनगर,धनकवडी येथे रहाते घरी जात असताना त्यांना यातील नमुद इसम दत्ता विठ्ठल भंगे याने अडवुन,फिर्यादी यांचे कुटुंबियांनी त्यांची बहीणीचे त्याचे बरोबर लग्न लावुन न देता तीचा साखरपुडा दुसरीकडे केल्याचा राग मनात धरुन,चिडुन जावुन त्याचेकडील धारदार शस्त्राने आगिराम यास जीवे मारण्याचे उद्देशाने त्याचे पोटावर व छातीवर वार करून गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.आर.मदने ९८८१३७०५०१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३४५/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा.मोरे, वारजे पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | नामदेव शिवानंद कापसे,वय-२६,रा.भुगाव,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/१७ रोजी १३/०० ते ०१/०० वा.चांदणी चौक ते डुक्कर खिंड पुल वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम नामदेव शिवानंद कापसे,वय-२६,रा.भुगाव,पुणे याने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी स्वतः मोटार सायकलवरून पडुन त्यामध्ये गंभीर जखमी होवुन, स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नदाफ ९९२३६९७२३४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४७४/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | एम.बी.बोरसे,पो.हवा., चतुःश्रृंगी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | तन्मय राजेंद्र देशपांडे,वय-२३ वर्षे,रा.सुवर्णरत्न गार्डन,कमिन्स कॉलेज रोड, कर्वेनगर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१७ रोजी २०/३० वा.इनफील्ड शो-रुम समोर बाणेर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी ज्येष्ठ नागरीक सुग्रिव शिवदास शिंदे,वय-७१ वर्षे,रा.मुं.पो.आर्नाळा,ता.परांडा,जि.उस्मानाबाद हे रस्ता ओलांडीत असताना त्यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (यातील जखमी सुग्रिव शिवदास शिंदे यांचेवर उपचार चालु असताना ते उपचारा दरम्यान मयत झाले आहेत.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. प्रमोद क्षीरसागर |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३७४/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | गोपाल जेसवानी,वय-६८,रा.गुरूनानक नगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/१७ रोजी १५/०० ते १६/०० वा.चे दरम्यान सुंदरी अपार्टमेंट,पहिला मजला, गुरूनानक नगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,तीन बेडरूम मधील कपाटातील रोख २ लाख रूपये,सोन्याचे दागिने व इतर महत्वाची कागदपत्रे असा एकुण १० लाख ८४ हजार ८०० रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस एस गायकवाड ९८२३९३८५५१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३७३/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | विकास कोल्हे, पो.शि. फरासखाना पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/१७ रोजी १६/०० ते दि.१०/०९/१७ रोजी पहाटे ०४/३० वा.चे दरम्यान स्वारगेट पोलीस लाईन पंप हाऊस मध्ये |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी, स्वारगेट पोलीस लाईन पंप हाऊस मध्ये राखीव ठेवलेली पाणी खेचण्याची पाच एच.पी.ची किर्लोस्कर कंपनीची मोटार ३ हजार रू किची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.ना. डी.डी.कदम ९६७३५७५८८३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २३६/१७,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | जयेश त्रिवेदी,वय-५८,रा.मुलुंड,पश्चिम मुंबई |
| **आरोपी** | संजीवकुमार उर्फ संजय रामेश्वर बगाडीया (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०७/१७ ते दि.३१/०८/१७ रोजीचे दरम्यान एज्युगॅन पाचवा मजला,गुलाब पॅव्हेलियन डेक्कन बस स्टॉप जवळ,डेक्कन जिमखाना,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना त्यांचे मुलींचे मेडीकल कॉलेज मध्ये एमबीबीएसचे प्रवेश करून देतो असे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करून,डोनेशन म्हणुन फिर्यादी यांचेकडुन सुरूवातीला २ लाख रूपये रक्कम स्वतःचे अर्थिक फायदयाकरीता घेवुन त्या रकमेचा अपहार करून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. तसेच फिर्यादी यांचेप्रमाणेच १.अरविंद कुमार शर्मा २.वेदप्रकाश गर्ग यांचीदेखील प्रवेश करून देतो असे खोटे सांगुन त्यांचेकडुन काही रक्कम स्विकारून फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. टी.सी.लांघी ८१४९४११०४५ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४७५/१७,भादविक ४०६,४०९,४२०,४६५,४६७,४६८,४७१,महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट कलम ३,१०,१३(१) |
| **फिर्यादी** | अतुल दिवेकर,वय-५५ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | दिपक यशवंत पाटील,रा.करिष्मा सोसायटी,कर्वे रोड,कोथरुड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑक्टोबर २०१४ ते आज पावेतो मौजे बालेवाडी, स.नं. ४२, हिस्सा नं.१० येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | माहे ऑक्टोबर २०१४ ते आज पावेतो इसम नामे दिपक यशवंत पाटील, रा.फ्लॅट नं. ९०४, बिल्डींग नं. ए-११, करिष्मा सोसायटी, स.नं. १७/२, सीटीएस नं. ६९७, कर्वे रोड, कोथरुड, पुणे. याने मौजे बालेवाडी, स.नं. ४२, हिस्सा नं. १० येथील सिध्दांत हाईटस गृहप्रकल्पाचे पुणे महानगरपालिकेचा बांधकाम सुरु करण्याचा दाखला (कमेन्समेंट सर्टीफिकेट) क्रमांक क्क/४५४७/१३ दि. १२/०३/२०१४ हा बनावट दाखला तयार करुन तो दाखवुन माझा विश्वास संपादन करुन त्याने सदर प्रकल्पात १. विंग बी मध्ये फ्लॅट नं. ७०३ क्षेत्रफळ ७२८ चौ.फुट कारपेट २. विंग बी मध्ये फ्लॅट नं. ७०४ क्षेत्रफळ ७२८ चौ.फुट कारपेट या फ्लॅटकरीता फ्लॅटची विक्री किंमत म्हणुन रुपये ५९,५०,०००/- व रजिस्ट्रेशन, स्टॅम्प डयुटी, लिगल फि रक्कमेकरीता रुपये ७,६५,४००/- असे एकुण ६७,१५,४००/- इतके रुपये विश्वासाने घेवुन त्यातील केवळ २०,००,०००/- रुपये परत करुन उर्वरीत ४७,१५,४००/- इतकी रक्कम परत न करता अपहार केला. तसेच सदर प्रकल्पाचे/फ्लॅटचे बांधकाम न करता मला माझे फ्लॅटचा मुदतीत ताबा न देता कोणत्याही प्रकारची फ्लॅटसंबंधी सोसायटी तयार करुन न देता माझी फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. प्रमोद क्षीरसागर |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८९४/१७,भादविक ४२०,४०९,४६७,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | सुभाष सुतार,वय-६६ वर्षे,रा.बिजलीनगर,काळे बोराटेनगर हडपसर,पुणे |
| **आरोपी** | १.स्टेट बॅंक ऑफ इंडीया मगरपट्टा शाखेचे तत्कालीन शाखा मॅनेजर २.बॅंक ऑफ महाराष्ट्र, भेकराईनगर शाखेचे तात्कालीन शाखा मॅनेजर ३.अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०६/२००८ ते दि.२६/०९/१३ वा.चे दरम्यान स्टेट बॅंक ऑफ इंडीया मगरपट्टा शाखा हडपसर,पुणे व बॅंक ऑफ महाराष्ट्र भेकराईनगर फुरसुंगी शाखा,पुणेयेथे |
| **तपशिल** | यातील नमुद १.स्टेट बॅंक ऑफ इंडीया मगरपट्टा शाखेचे तत्कालीन शाखा मॅनेजर २.बॅंक ऑफ महाराष्ट्र, भेकराईनगर शाखेचे तात्कालीन शाखा मॅनेजर ३.अज्ञात इसम यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांच्या खोट्या सह्या करुन,त्या खऱ्या आहेत असे दाखवुन,स्टेट बॅंक ऑफ इंडीया मगरपट्टा शाखा,हडपसर,पुणे व बॅंक ऑफ महाराष्ट्र,भेकराईनगर,फुरसुंगी शाखा पुणे या बॅंकेतील त्यांचे खात्यावरुन वेळोवेळी रक्कम काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.जे.घुगे ९५५२५९०३४७ |
| ९ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३६४/१७,भादविक २८७,३३६,४२७,मोव्हे.११९/१७७ |
| **फिर्यादी** | विजय कोतवाल,वय-५९,रा.पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | युवराज चंद्रकांत कुदळे,वय-४२,रा.हिवरे,ता.पुरंदर,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०९/१७ रोजी २०/०० वा.श्री स्वामी समर्थ बाईक सर्व्हिसेस गॅरेज दुकान जय भवानी नगर,पिंपळे-गुरव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद पीएमपीएमएल हिचेवरील चालक यातील नमुद इसम युवराज चंद्रकांत कुदळे याने त्याचे ताब्यातील पीएमपीएमएल बस क्र.एमएच/१४/सीडब्ल्यु/१७०९ ही श्री स्वामी समर्थ बाईक सर्व्हिसेस गॅरेज दुकान जय भवानी नगर,पिंपळे-गुरव,पुणे याठिकाणी चालु करून ठेवुन,हयगयीने,जाणीवपुर्वक काळजी घेण्याचे टाळुन बसचे खाली उतरून चहा पिण्यासाठी निघुन गेला असता,सदर बस ही चालु स्थितीमध्ये फिर्यादी यांचे मालकीचे गॅरेजचे दुकानात घुसुन एकुण तीन मोटार सायकली व गॅरेज असे एकुण सुमारे ४० हजार रू किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.पी.केंद्रे |
| १० | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५३४/१७,भादविक ३१७,३१८ |

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | डी.एस.शेळके, पो.हवा. वाकड पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि ११/०२/२०१७ रोजी सकाळी ११/३० वा.चे पुर्वी मोरया गोसावी मंदीर चिचवडगाव चे शेजारी स्मरशाभुमी समोर पवना नदी पत्रात पाण्यात |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात महिलेने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन एक पुरूष जातीचे जन्मलेले नवजात अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,त्याचे पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,मोरया गोसावी मंदीर चिचवड,पुणे शेजारील स्मशान भुमीचे समोर पवना नदी पात्रात पाण्यात फेकुन देवुन,त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला म्हणुन सदर अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एस.घोळवे |

**११**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५३५/१७,भादविक ३७६,५०६,३२३ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२,रा.पुणे |
| **आरोपी** | १.संजीत रंजीत चासा,वय-२०,रा.संदिप कलाटे चाळ,वाकड,पुणे २.मंगल शुक्ला वैद्य,वय-२३,रा.सदर (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सुमारे सात ते आठ दिवसापुर्वी १८/०० ते १९/०० वा.चे दरम्यान वाकड,पुणे येथील सोसायटी मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुरक्षारक्षक यांनी फिर्यादी यांचे सोसायटी मध्ये खेळत असलेली फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी,वय-०५ वर्षे हिचेबरोबर लैंगिक अत्याचार केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. आढाव ८२३७१९२०१८ |

## दि.१३/०९/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३१७/१७,भादविक ३२४,१४१,१४३,१४६,१४७,१४८,४२७, महाराष्ट्र पोलीस ॲक्ट १४२,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो.का.३७(१)३ सह १३५ |
| **फिर्यादी** | सागर लगाडे,वय-२४,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | १.महेश तिमाप्पा धनगर २.सौरभ तिमप्पा धनगर ३.अनिल अशोक कांबळे ४.अरूण लक्ष्मण शेट्टी ५.राहुल पाटणेकर ६.टिपु सुलतान ७.हेमंत नाईक ८.राहुल साळवे ९.विनोद रेड्डी,सर्व रा.ताडीवाला रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/१७ रोजी २३/३० वा. कौन्सिल हॉल चौक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरासमोर उभे असताना,यातील नमुद इसम महेश धनगर याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्याचे हातात कोयता घेवुन येवुन,फिर्यादी यांचे हाता वर कोयत्याने वार करून,तसेच इतर साथीदारांनी लाथा-बुक्कयांनी मारहाण करून त्यांना जखमी करून,दहशत निर्माण करण्यासाठी रोडवर पार्क केलेल्या तीन चाकी गाडयांचा काचा फोडुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.एन.ढोले ९८२२९०७१०० |

## दि.१२/०९/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | भा.विद्यापीठ | भादविक ३०७,३४१,५०४,५०६ | दत्ता विठ्ठल भंगे | २४ |
| २ | चतुःश्रृंगी | भादविक ४०६,४२०,५०६ | दिपक यशवंत पाटील | ५२ |
| ३ | डेक्कन | भादविक ४०६,३४ | अविनाश मधुकर दळवी | ४६ |
| ४ | डेक्कन | भादविक ४०६,३४ | संजय मुधकर दळवी | ५२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | हिंजवडी | भादविक ४०६,४२० | तुकाराम शांताराम रौंधळ | २३ |
| ६ | मुंढवा | भादविक ३८० | दिनेश गोपाळ गणोरे | ३२ |
| ७ | वानवडी | भादविक ३९२,३४ | दिनेश गोपाळ गणोरे | ३२ |
| ८ | वानवडी | भादविक ४०६,४२०,३४ | शहनवाज समीर महमदआलम | २४ |
| ९ | चिंचवड | भादविक ३०२,३२३,५०४ | धिरज नंदकुमार शिंदे | ३० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**